### डॉ. रणजित रथ यांचे आयआयएममध्ये दाखल विद्यार्थ्यांना आवाहन

# लीडर होण्यापूर्वी चांगला माणूस बना

**नागपूर,** मेट्रो रिपोर्टर. आयआयएम सारख्या संस्थेत प्रवेश मिळविणे सोपे नाही. समाजात वावरणाऱ्या हुशार विद्यार्थ्यांमध्ये समावेश असल्याने नव्या जबाबदाऱ्या स्वीकारण्यासाठी सज्ज होण्याची ही संधी चालून आली आहे. त्यामुळे समोर येणारी प्रत्येक संधीतून नवा शोध घ्यावा. त्यातून नव्या गोष्टी मिळविण्यासाठी जीवतोड मेहनत करा, चांगले लीडर्स व्हा पण त्यापूर्वी चांगला माणूस म्हणून ओळख मिळवा, असे आवाहन एमईसीएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. रणजित रथ यांनी केले. भारतीय व्यवस्थापन संस्थेत (आयआयएम-एन) विद्यार्थ्यांची 8वी व पीएचडी करणाऱ्यांची 2री बॅच दाखल झाली. मिहान येथील आयआयएमच्या नव्या कॅम्पसमध्ये दाखल होणाऱ्या पहिल्या बॅचच्या स्वागत कार्यक्रमात ते मार्गदर्शन करीत होते. आयआयएमच्या नव्या एमबीए बॅचमध्ये देशभरातील 20 राज्यातील विद्यार्थ्यांनी प्रवेश मिळविला आहे. नव्या बॅचमध्ये मागील वर्षीच्या तुलनेत मुलीची संख्या जवळपास दुप्पट झाली असून ती विद्यार्थी संख्येच्या 42.8% पर्यंत पोहचली आहे.



## दोन वर्षे करा कठोर मेहनत

नव्या बॅचचे स्वागत करताना आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मैत्री यांनी संस्थेची निवड केल्याबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले. आयुष्यात जे निवडाल तसेच घडाल असे सांगून मैत्री म्हणाले, आयआयएम नवे स्वरूप घेत असून नव्या शिखराकडे झेप घेत असल्याने त्याचा फायदा येथे येणाऱ्या विद्यार्थ्यांना नक्कीच होईल. भविष्यातील मोठ्या कंपन्यात अनोळखी व मोठी जबाबदारी स्वीकारण्यासाठी चेंज मास्टर म्हणून काम करण्याची तयारी करायची आहे. यासाठी पुढील दोन वर्षे कठोर मेहनत व प्रशिक्षणासाठी तयार राहण्याची तयारी करण्याचे आवाहन केले. यावेळी आयआयएमच्या पीजीपीचे प्रा. प्रकाश अवस्थी यांनी उद्योग-शैक्षणिक संवाद, समर इंटर्नशिप, आंतरराष्ट्रीय विनिमय कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय विसर्जन कार्यक्रम इत्यादींबाबत भरपूर एक्स्पोजर मिळेल, अशी माहिती त्यांनी दिली. 2021-23 च्या बॅचमधील उत्कृष्ट एमबीए विद्यार्थ्यांना या प्रसंगी डायरेक्टरचे मेरिट सर्टिफिकेट आणि सर्टिफिकेट ऑफ मेरिट प्रदान करण्यात आले.